**महाराष्ट्र शासन**

क्रमांक. डिएसआर २०१५/प्र.क्र.४६/आस्था-०५
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक :२५ जुलै, २०१८.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**विषय :** आदिवासी / नक्षलग्रस्त भागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

**संदर्भ :** ग्रामविकास विभागाची शासनपत्रे क्रमांक.

१) वेतन २०१३/प्र.क्र.११६/आस्था.१०, दिनांक १७.४.२०१३.

२) वेतन २०१३/प्र.क्र.११६/आस्था.१०, दिनांक १२.११.२०१३.

३) डिएसआर २०१५/प्र.क्र.४६/आस्था.५, दिनांक ३०.१०.२०१५.

४) डिएसआर २०१५/प्र.क्र.४६/आस्था.५, दिनांक २५.११.२०१६.

५) डिएसआर २०१५/प्र.क्र.४६/आस्था.५, दिनांक ९.३.२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे.

आदिवासी / नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना एकस्तर / वरिष्ठ वेतनश्रेणी व इतर अनुषंगिक लाभासंदर्भात या विभागाच्या संदर्भ क्र .१ ते ४ येथील दिनांक १७.४.२०१३, १२.११.२०१३, ३०.१०.२०१५, २५.११.२०१६ या पत्रानुसार सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय शासन स्तरावरुन आपणांस कळविण्यात आलेले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक. टिआरएफ २०००/प्र.क्र.३/बारा, दिनांक ६.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी / नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंत एकस्तर पदोन्नतीचा लाभ देण्यासंदर्भात जिल्हा परिषद , यवतमाळ येथील काही संघटनांनी / कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.३६९९/२०१६ व ४३१७/२०१६ दाखल केल्या. सदर रिट याचिकांचा निकाल दिनांक ४.७.२०१७ रोजी देण्यात आला. त्या न्यायनिर्णयानुसार एकस्तर वेतनश्रेणी /वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ संबंधित कर्मचाऱ्यांना मंजूर करण्याच्या उद्देशाने उपरोक्त संदर्भ क्र .५ येथील दिनांक ९.३.२०१८ चे पत्र निर्गमीत करण्यात आले होते . तथापि, काही जिल्हा परिषदांनी आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी / वरिष्ठ वेतनश्रेणीसह

प्रोत्साहन भत्ता व इतर अनुषंगिक लाभ मंजूर करण्याच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त संदर्भ क्र.५ येथील दिनांक ९.३.२०१८ चे पत्र याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी मला आपणास असे कळविण्याचे निदेश आहेत की, "मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र.३६९९/२०१६ व ४३१७/२०१६ च्या दिनांक ४.७.२०१७ रोजीच्या निर्णयानुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक. टिआरएफ २०००/प्र.क्र.३/बारा, दिनांक ६.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी / नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी / वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी."

आपला,

**( सं.ना.भंडारकर )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, कार्यासन आस्था.५ निवडनस्ती.